# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक ०२/०३/२०२२ (बुधवार)

---

## ऑटोला ट्रकचा कट लागल्याचे बनाव करून फिर्यादीचा आयसर ट्रक व नगदी, ४३,०००/— रू असा एकुण १२,४३,०००/— रू चा माल जबरी चोरी करणारे ३ आरोपी कळमेश्वर पोलीस डि बी पथकाने अवघ्या तिन तासात पकडुन गुन्हा उघड केला.

पोलीस स्टेशन कळमेश्वर — अंतर्गत फिर्यादी सुरेश पाटील वय २९ वर्षे व्यवसाय — ट्रक चालक रा वाकोडी पो स्टे वाघडु ता चाळीसगाव जिल्हा जळगाव याने तक्रार दिली कि, त्याने सावरगाव नाशिक येथुन कांदामाल आपल्या ताब्यातील आयसर ट्रक क्र एम एच १८ बी जी ८५०७ व लोड करून कळमना माकेट येथुन खाली करून दिनांके ०१.३.२२ रोजी सायंकाळी ०५.१५ वा दरम्यान नागपुर कडुन गौंडखैरी मार्ग बाजारगाव कोंढाळी येथुन बुलढाणा येथील माललोड भरण्याकरीता आयसर ट्रक क्र एम एच १८ बी जी ८५०७ स्वत: चालवित जात असता मौजा गोंडखैरी शिवार टोलनाकाजवळ ३ अनोळखी ईसम यांनी संगणमत करून फिर्यादीस लुटण्याचे उद्देशान ऑटोला कटचा कट लागल्याचा बनाव करून फिर्यादीला शिवीगाळ करून ट्रक थांबविले. व ट्रकचे समोरचा काच फोडुन ट्रकचे बाहेर ओढुन आपल्या हातातील लाकडी दंडा व लाथाभुक्क्याने मारहाण करून फिर्यादीचे डोके फोडले. फिर्यादीचा आयसर ट्रक क्र एम एच १८ बी जी ८५०७ किंमती १२,००,०००/—. रू व नगदी रोख रक्कम ४३,०००/— रू असा एकुण १२,४३,०००/— रू चा माल जबरीने हिसकावुन घेवुन गेल्याचे फिर्यादीचे तोंडी रिपोर्टवरून अज्ञात आरोपीविरूध्द गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

सदर घटनेची पो स्टे कळमेश्वर येथे माहीती मिळताच घटनेचे गांभीर्य पाहता पोलीस निरीक्षक श्री आसीफराजा शेख पोलीस स्टेशन कळमेश्वर यांनी तात्काळ डि बी पथकातील स्टाफ ला मार्गदर्शन करून घटनास्थळ पोहचुन अवघ्या ३ तासात **आरोपी नामे— सतिष पुरूषोत्तम लोहकरे वय २४ वर्ष रा रामजी आंबेडकर नगर, आठवा मैल अमरावती रोड नागपुर २) इस्लाउद्दीन उर्फ रिजवान शब्बीर शेख वय २२ वर्ष रा. दवलामेटी ८ मैल, अमरावती रोड नागपुर, ३) अक्षय राजेंद्र सोनवणे वय २५ वर्ष रा रामजी आंबेडकर नगर, आठवा मैल अमरावती रोड नागपुर** यांना ताब्यात घेवुन त्यांनी जबरीने हीसकावलेला **आयसर ट्रक क्र एम एच १८ बी जी ८५०७ किंमती १२,००,०००/—. रू चा माल जप्ती** करून गुन्हा उघडकीस आणला.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक साहेब विजयकुमार मगर सा., अपर पोलीस अधिक्षक राहुल माकणीकर, उपविभागीय पोलीस अधिकारी पुजा गायकवाड मॅडम, पोलीस निरीक्षक श्री आसीफराजा शेख पोलीस स्टेशन कळमेश्वर यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक मनोज खडसे, पोलीस उपनिरीक्षक शिवाजी मुंडे, सफौ मन्नान नौरंगाबादे, प्रमोद कळंबे, पोना गणेश मुदमाळी, रवि मेश्राम, श्रीकांत बोरकर पोलीस शिपाई निलेश उईके, प्रदीप सरोदे चालक तुशार भोयर यांनी पार पाडली.

**(सदर बातमीचा फोटो सोबत जोडलेला आहे.)**

## घरफोडी

**पोलीस स्टेशन सावनेर –** अंतर्गत नवीन गुजरखेडी पुर्व ३ कि.मी. यातील फिर्यादी हे आपल्या परीवारासह दि. २८/०२/२०२२ चे सकाळी ०९/०० वा. ते रात्री २१/०० वा. दरम्यान बाहेरगावी गेले असता कोणीतरी अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचे दाराचे ताला तोडून घरामध्ये प्रवेश घरामधील लोखंडी आलमारीतील **ठेवलेले सोन्याचे ५१.०९ ग्रॅम वजणाचे जूने वापरते दागिणे १,३५,११०/— रू. तसेच ७०० ग्रॅम वजनाचे चांदीचे जूने वापरते दागिणे किंमत अंदाजे १४,०००/— रू. असा एकूण १,४९,११०/— रू. चे सोन्याचे व चांदीचे दागिणे चोरून नेले.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— लिला चुन्नीलाल सुर्यवंशी वय ३४ वर्ष रा. नवीन गुजरखेडी ता. सावनेर यांचे तक्रारीवरून पोलीस स्टेशन सावनेर येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ४५४,४५७,३८० भा.द.वी अंतर्गत गुन्हयाची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास स.फौ. अनिल तिवारी मो. नं. ९६८९८९१४८६ हे करीत आहेत.

## अपघातात जखमी करणा—या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी :—** अंतर्गत इंडोरामा गेट क्र ०५ जवळ. यातील जखमी नामे विपीन जिवन सिंग वय २८ वर्ष रा. टेंभरी हा दिनांक ०१/०३/२२ चे १४/१० वा. दर घरून इडोरामा कंपनी येथे ड्युटीवर पायदळ जात असतास ईडोरामा गेट क्र ५ जवळ यातील आरोपी याने त्याचे ताब्यातील मोटर सायकल क्र. एमएच—४०/सिबी— ८१८५ ने भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन जखमीस धडक मारून अपघातात त्याचे जखमी होणेस आरोपी कारणीभुत असल्याने जखमीचा उप. माया हॉस्पीटल येथे सुरू आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— प्रशांत श्यामराव डबुरकर वय ४० वर्ष रा वार्ड नं ३ टाकळघाट यांचे रिपोर्टवरुन मोटर सायकल क्र एमएच—४०/ सिबी— ८१८५ चा चालकाविरूध्द एम आय डी सी बोरी येथे कलम २७९, ३३७, ३३८, भादवी सहकलम — ३/१८५ मोटर वाहन कायदा. अन्वये गुन्हा नोंद केलेला असून पुढील तपास स फौ तरमले मो क्र ९९२३६९९१८५ हे करीत आहे.

## स्वताला जाळुन आत्महत्या

**पोलीस स्टेशन वेलतुर :–** अंतर्गत मौजा किन्ही १२ कि.मी. पश्चिम शेत शिवार, दिनांक ०१/०३/२०२२ चे ०६/०० वा. ते ०६/३० वा. दरम्यान यातील मृतक नाम– आत्माराव मोतीराम ठवकर वय ८० वर्ष रा. किन्ही हे आध्यात्मीक वृत्तीचे असुन दररोज पुजा अर्चना करायचे. त्यांना नेहमी पोटात दुखण्याचा त्रास होता व एक डोळा निकामी झाला होता व दुसऱ्या डोळयाला सुध्दा कमी दिसत असल्याचे त्रासाला कंटाळुन मृतक यांनी शेतातील गॅस गोडाऊन च्या मागे असलेल्या लाकडांवर पुजा अर्चा करून स्वताला जाळुन आत्महत्या केली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– चिंधु आत्माराम ठवकर वय ५३ वर्ष रा कीन्ही यांचे रिपोर्टवरून पो स्टे वेलतुर येथे कलम १७४ जाफौ अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला. सदर मर्गचा पुढील तपास स.पो.नि./ नितेश डोर्लीकर पो.स्टे. वेलतुर मो.नं. ९५९५६७८२३४ करीत आहेत.

**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपुर**